


# कृतिशील पर्यावरणवादाचा साहित्यठेवा

**विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या विकासाची दिशा चुकली याची जाणीव भारतातील ज्या काही मोजक्या विचारवंतांना झाली, त्यामध्ये ज्येष्ठ पर्यावरणवादी दिलीप कुलकर्णी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी हे विचार - उच्चार - आचार यांमध्ये एकवाक्यता साधलेले कुटुंब... परिवर्तनाची स्वप्न पाहणाऱ्या त्यांच्यासारख्या अनेक वाटसरूंसाठी ५ जून या 'जागतिक पर्यावरण दिना'च्या औचित्याने त्यांच्या १४ पुस्तकांचा संक्षिप्त परिचय करून देणारा हा लेख.**



**अजित बर्जे**
लेखक नाशिक येथील निसर्ग व पर्यावरण संदर्भसाहित्याच्या 'कारवी रिसोर्स लायब्ररी'चे सहसंचालक व पर्यावरण अभ्यासक आहेत.

*"I went to the woods because I wished to live deliberately, to front only the essential facts of life, and see if I could not learn what it had to teach, and not, when I came to die, discover that I had not lived."*


***- Henry David Thoreau***

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यान्हीला जेव्हा औद्योगिकीकरण नुकतेच बाळसे धरू लागले होते, त्या सुमारास थोर अमेरिकन चिंतक हेनरी थोरोला पुढे येऊ घातलेल्या परिस्थितीची जाणीव झाली असावी का? नाहीतर भौतिकतेचा विळखा दृष्टीपथातही नसताना साध्या व स्वयंपूर्ण राहणीमानाचा प्रयोग करण्यासाठी वॉल्डन तळ्याकाठी झोपडी बांधून राहण्याची उर्मी त्याच्यात कुठून आली असेल?

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या विकासाची दिशा चुकली याची जाणीव भारतातील ज्या काही मोजक्या विचारवंतांना झाली त्यामध्ये दिलीप कुलकर्णी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. केवळ तात्विक स्तरावर व विचारांच्या पातळीवर ती जाणीव न राहता ज्यांनी त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली असे दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी हे विचार - उच्चार - आचार यांमध्ये एकवाक्यता साधलेले कुटुंब. आपल्या आयुष्याचे अग्रक्रम बदलून, प्रचलित शहरी जीवन

नाकारून आडवळणाच्या गावात स्थायिक झाले. पर्यावरणाच्या समस्येविषयी सतत अभ्यास, मनन व चिंतन यामधून पर्यावरणाच्या विविधांगी विषयावर गेल्या तीन दशकांहून अधिक काळात त्यांनी विपुल लेखन केले. विषयाची तर्कशुध्द व सुबोध मांडणी हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य. 'राजहंस प्रकाशना'च्या माध्यमातून त्यांचे बहुतेक विचार ग्रंथरूपाने प्रसिध्द झाले आहेत. यंदाच्या 'पर्यावरण दिनाच्या निमित्ता'ने 'हरित साहित्यसंपदा' या लेखमालेत आपण त्यांनी लिहिलेल्या विषयांच्या वैविध्यानुसार १४ पुस्तकांचा धावता आढावा घेणार आहोत. प्रस्तुत ग्रंथसंपदा 'राजहंस प्रकाशन' संस्थेने प्रसिद्ध केली आहे.


## निसर्गायण




'निसर्ग प्रत्येक व्यक्तीची गरज भागवू शकतो; पण हाव नाही', हे गांधींचे प्रसिध्द वचन त्यांच्या एकूणच विचारांचा पाया. चैन आणि गरज याची गल्लत केल्याने पर्यावरणाचे प्रश्न उत्तरोत्तर गंभीर होत गेले. हे प्रश्न माणसाच्या भोगवृत्तीतून व मनोवृत्तीतून निर्माण झाले आहेत. केवळ निसर्गातील असमतोलच नाही, तर व्यक्तिगत स्तरावर मानसिक तणाव, व्यसनाधीनता, स्वैराचार, तर सामाजिक स्तरावर गुन्हेगारी, दुर्बलांवरचे अत्याचार, शस्त्रस्पर्धा अशा चढत्या भाजणीत समस्याही वाढत आहेत. त्यावर केवळ बाह्य स्वरूपाची तांत्रिक व व्यवस्थापकीय उत्तरे शोधून उपयोग नाही, तर व्यक्तीच्या मनोवृत्तीमध्ये जोवर मूलभूत परिवर्तन होत नाही व त्यानुसार विचार व कृतीमध्ये बदल केले जात नाहीत, तोपर्यंत या समस्या सुटणार नाहीत हा या पुस्तकाचा गाभा. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र व पुढे जाऊन जागतिक स्तरावरील आज उभ्या राहिलेल्या समस्या व त्याचे परिणाम रोखायचे असतील तर त्याची सुरुवात व्यक्तिगत पातळीवर जीवनदृष्टी, जीवनध्येय व त्यानुसार जीवनशैली बदलण्याची नितांत गरज आहे. असे झाले तरच निसर्गाचे संरक्षण व संधारण होईल, असा आशावाद त्यातून व्यक्त केला गेला आहे. वयाच्या केवळ विशीत असताना विज्ञान, तत्त्वज्ञान व पर्यावरण याची गुंफण घालून पर्यावरणाचा मूलगामी व एकात्म विचार मांडणारा दिलीप कुलकर्णी यांचा पहिलाच ग्रंथ त्यांच्या वैचारिक बैठकीचा पाया किती विस्तृत आहे, याची जाणीव करून देतो.

*(पृष्ठ संख्या: २००, किंमत: रु. २४०/-)*

## हसरे पर्यावरण




'पर्यावरण' या विषयाचा आज जरी शालेय अभ्यासक्रमांमध्ये समावेश करण्यात आला असला तरी; त्याचे मुल्यांकन श्रेणी पद्धतीने होत असल्याने तो विषय ना शालेय पातळीवर गंभीरपणे घेतला जातो, ना विद्यार्थी स्तरावर. त्यामुळे पुढे येऊ घातलेल्या परिस्थितीचे गांभीर्य मुलांपर्यंत पोहोचतेच असे नाही. केवळ जुजबी स्तरावर याची जाणीव होऊन या समस्या सुटणार नसून आचरणातूनच या समस्या आपल्याला सोडवणे शक्य आहे, हे विद्यार्थी दशेतच त्यांच्या मनावर बिंबवले गेले तरच येणारा काळ भावी पिढ्यांसाठी सुसह्य असेल. शैक्षणिक चौकटीच्या बाहेर पडून अशी जीवनदृष्टी सहज शब्दात देते 'हसरे पर्यावरण' हे पुस्तक. पर्यावरणाच्या वैशिष्ट्यांची आणि समस्यांची केवळ माहिती देऊन हे पुस्तक थांबत नाही तर पर्यावरणाची जी एक जीवनदृष्टी मुलांच्या मनात विकसित व्हावयास हवी ती ते सहज निर्माण करते. सहज साधलेल्या संवादातून विषयाची माहिती एकीकडे मुलांना रंजकपणे मिळतेच, आणि त्याचबरोबर समस्या व उपाय या दोन्हींशी आपण अतूटपणे जोडलेले आहोत याची जाणीव देत राहून त्यांना कृतीसाठी प्रेरणाही देते. पुस्तकामध्ये पर्यावरणाच्या मूलभूत संकल्पनांची मांडणी, निसर्गाची चक्रीयता, परस्परावलंबन, देवाण-घेवाण, विकेंद्रितता,

विघटनक्षमता, मर्यादा तसेच आचरणाच्या पातळीवर आपण काय करू शकतो याची सुबोध मांडणी केली आहे.

*(पृष्ठ संख्या: ८०, किंमत: रु. १००/-)*

## दैनंदिन पर्यावरण





दिवसेंदिवस रोजच्या जगण्यातल्या समस्यांमध्ये वाढ होत आहे याची जाणीव सर्वांनाच होत आहे; पण त्याच्या मुळाशी आपले अतिरेकी उपभोग हेच त्याचे कारण आहे हे जर समजून घेतले, तर त्यावर उपाय ही आपल्याच हातात आहे याची आपल्याला जाणीव होईल. त्यामुळे या समस्या जर सोडवायच्या असतील तर आपले वागणे बदलायला हवे हे ओघाने आलेच; पण वागणे बदलायचे म्हणजे नेमके काय करायचे? दैनंदिन जीवनामध्ये घरात, कार्यालयात, शाळेत, प्रवासात, शेतात, स्वयंपाक घरात किंवा अगदी न्हाणीघरात प्रत्यक्षामध्ये काय करायचे आणि काय टाळायचे याचे व्यावहारिक स्तरावर मार्गदर्शन करणारे विवेचन हलक्याफुलक्या शैलीत या पुस्तकात केले आहे. दैनंदिन जीवनात करण्याच्या व टाळण्याच्या अशा शंभराहून अधिक 'टिप्स' यामध्ये आहेत. 'आपल्यालाही हे सहज जमेल', असे वाटायला लावून त्या गोष्टी करायला हे पुस्तक प्रवृत्तही करेल.

*(पृष्ठ संख्या: १२२, किंमत: रु. १४०/-)*

## अणु विवेक


अण्वस्त्र ही विध्वंसक आहेत आणि त्यामुळे ती वाईट आहेत हे सर्व जण जाणतोच; पण अणुवीज निर्मितीबद्दल असे सांगितले जाते की, ती स्वच्छ, स्वस्त आणि सुरक्षित आहे. मात्र, सन १९८६ रोजी चेर्नोबिलमधील व अलीकडे सन २०११ मध्ये जपानमधील फुकुशिमा येथे झालेल्या दुर्घटनांमुळे अणुवीज सुरक्षित असल्याच्या समजालाही धक्का बसला. अपघातांव्यतिरिक्त




किरणोत्सर्गी उर्वरितांच्या रूपाने लक्षावधी वर्ष हा धोका टिकून राहणार आहे, हेही त्यानिमित्ताने सिद्ध झाले. उच्च तंत्रज्ञान आणि लष्करी गुपिते या सबबीखाली लोकांच्या जीवाशी व एकूणच पर्यावरणासाठी हे किती घातक आहे व असा विषारी वारसा कसा निर्माण करून ठेवला जात आहे, याचे वास्तव या पुस्तकाच्या निमित्ताने आपल्या समोर येते. अणूचे विज्ञान, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, त्यामागचे अर्थशास्त्र, त्याच्या सुरक्षिततेबाबत दृष्टिकोन, संरक्षण विषयक पैलू, तसेच त्यामागील राजकारण, त्याविषयी पर्यावरणीय दृष्टिकोन, विचारवंतांची व विरोधकांची त्यामागील भूमिका, तसेच त्याचा मानवतावादी दृष्टिकोन अशा एकूण नऊ विभागातील वेगवेगळ्या प्रकरणातून याविषयीचा सर्वांगीण विचार त्यांनी आपल्या पुढे ठेवला आहे.

*(पृष्ठ संख्या: १४४, किंमत: रु. १६०/-)*

## सम्यक विकास





'सम्यक' हा बौद्ध तत्त्वज्ञानातील शब्द. त्याचा अर्थ 'सर्वार्थाने योग्य'. संयमित उपभोगातून व्यक्तीच्या स्तरावर शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक असा आंतरिक विकास तर बाह्य स्तरावर कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय व पर्यावरणीय अशा सर्व स्तरावरचा सतत घडणारा विकास म्हणजेच सम्यक विकासाची आदर्श प्रक्रिया. या पार्श्वभूमीवर विकासाची प्रचलित संकल्पना केवळ भौतिकतेमध्ये होणारी वाढ इतक्या संकुचित अर्थाने गृहीत धरली जाते. केवळ उपभोग वाढीशी व उत्पादन

वाढीशी जोडलेल्या या झापडबंद संकल्पनेचे गारुड 'जीडीपी'च्या आधारे अर्थशास्त्राने इतके बळकट केले आहे की, व्यक्ती, समाज आणि निसर्गावर होणारे त्याचे भयंकर दुष्परिणाम जाणीवपूर्वक दुर्लक्षून आपण वेगाने त्याच दिशेने पुढे जाण्याचा आटापिटा करत आहोत. अशा तऱ्हेने अर्थशास्त्राच्या मोजपट्ट्या जरी विकास होत असल्याचे दाखवत असल्या तरी प्रत्यक्षात मात्र सर्व स्तरावर अधःपतन होत असल्याचे आपण पाहत आहोतच. अशी उपभोग वाढ आंतरिक पर्यावरणाच्या मर्यादेबाहेर होत असल्याने, मनाची व शरीराची हानी होत आहे, तर अनिर्बंध उत्पादन वाढीमुळे निसर्गातील संसाधनांची मर्यादा ओलांडली जात आहे. सम्यक विकासाचा केंद्रबिंदू संयमित उपभोग हा असल्याने त्यातून सर्व स्तरावरील सुस्थिती साधली जाणे हे त्याचे फलित आहे. पुस्तकाच्या एका भागात सम्यक विकासाचा तात्विक विचार व त्याविषयीच्या संकल्पनेची मांडणी केली आहे, तर दुसऱ्या भागात दैनंदिन जीवनातील त्याचे विविध आयाम समजावून त्यानुसार त्याचे मूल्यमापन केले आहे.

*(पृष्ठ संख्या: १४८, किंमत: रु. १४०/-)*

## वेगळ्या विकासाचे वाटाडे




'विकास' हा आज परवलीचा शब्द झाला असला तरी तो आपल्याला तसा नवा नाही. अगदी ढोबळमानाने बोलायचे झाल्यास अन्न-धान्याची सुबत्ता, सर्वांना निवारा, शिक्षण, आरोग्य, दळणवळणाच्या योग्य सुविधा, करमणुकीची व संपर्काची भरपूर साधने, या व अशा आपल्या विकासाच्या संकल्पनेतल्या गोष्टी. थोडक्यात, कमीतकमी हालअपेष्टांचे व भरपूर सुख-सुविधांचे आणि भौतिक समृद्धी असलेले दैनंदिन जीवन यालाच आपण विकास मानतो. विशेषतः विसाव्या शतकात तंत्रज्ञानाने जी अभूतपूर्व उंची गाठली त्यामुळे या विचारसरणीला आधी पाश्चिमात्य जगात व त्यांच्या पावलावर पाऊल टाकत आपणही याचा स्वीकार केला. या विकासनीतीने आपली भौतिक स्थिती जरी खूप उंचावली, तरी अनेक समस्या व गुंतागुंतीही निर्माण करून ठेवल्या आहेत.

ज्या वेगवेगळ्या पाच व्यक्तींचा व त्यांच्या विकासविषयक विचारांचा प्रभाव व्यक्ती म्हणून दिलीप कुलकर्णी यांच्यावर सर्वाधिक पडला, त्यांचे विचार त्यांच्याच शब्दात एकत्रितपणे या पुस्तकातून मांडले आहे. यामध्ये महात्मा गांधी यांच्या पर्यायी अर्थशास्त्राची व जीवनविचारांची मांडणी तसेच पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे एकात्म मानव दर्शन याबाबतचे विचार मांडले आहेत, तर प्रसिद्ध पदार्थ वैज्ञानिक फ्रिटयॉफ काप्रा, अर्थतज्ज्ञ व तंत्रज्ञान विषयक विचारवंत ई. एफ. शुमाखर, आणि भाकीत तज्ज्ञ व स्वतःला 'अँटी - इकॉनॉमिस्ट' म्हणवून घेणाऱ्या हेझेल हेंडरसन या तीन पाश्चिमात्य व्यक्तींचे विचार मांडले आहेत. या सर्वांची घडण वेगवेगळी आहे, स्थल - काल भिन्न आहेत तसेच परंपरा आणि संस्कारही वेगळे आहेत. असे असले तरी प्रचलित विकासाची वाट विनाशाकडे नेणारी आहे याबाबत त्यांचे मतैक्य दिसून येते. वरील प्रत्येकाच्या जगण्याचा हेतू, तसेच अर्थव्यवस्था, यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरण, शेती, पर्यावरण अशा काही सामाईक तर स्वदेशी, आरोग्य, स्त्री-वाद, अणू विरोध, अशा काही विशिष्ट विषयांचा, त्या-त्या व्यक्तींच्या विचारधारेचा मागोवा या पुस्तकातून घेण्यात आला आहे.

*(पृष्ठ संख्या: १४८, किंमत: रु. १८०/-)*

## सौर आरोग्य


विकासाच्या संकल्पनेमध्ये खरे तर आरोग्याचे स्थान मोठे असायला हवे. केवळ अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज इस्पितळे व आरोग्याचा विमा म्हणजे विकास नाही. 'शारीरिक रोगांचा अभाव' इतक्या संकुचित अर्थाने आपण 'आरोग्य' हा शब्द वापरतो. कुठल्याही व्यक्तीच्या शारीरिक आरोग्याबरोबरच त्याचे मानसिक, बौद्धिक, आणि आध्यात्मिक स्वास्थ्यही तितकेच महत्त्वाचे आहे. आणि कुठल्याही व्यक्तीला तिच्या परिसरापासून वेगळे काढता येत नसल्याने त्या व्यक्तीचा परिवार,




तिचा समाज आणि भोवतालचे पर्यावरणही तितकेच महत्त्वाचे आहे. मानसिक ताणजन्य व्याधींचा विस्फोट एकीकडे माणसाचे स्वास्थ्य उध्वस्त करतोय, तर नैसर्गिक संसाधनांच्या बेसुमार वापरामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडतेय. मूलतः व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र या सर्व स्तरावरचे स्वास्थ्य सूर्याशी निगडित आहे. जीवनशैली जर सूर्याशी जोडली असेल, तर व्यक्तिगत स्तरावरील स्वास्थ्य व विकासनीती पण सूर्याशी निगडित हवी. लेखकाने मानव आणि पर्यावरण स्वास्थ्याचा एकात्म विचार या पुस्तकातून केला आहे. या सर्वांविषयी योग्य दृष्टी व परिस्थिती काय असायला हवी याविषयी यात जशी चर्चा आहे तशीच आरोग्याची सद्य:स्थिती, आरोग्याची ध्येयनिश्चिती, आरोग्याची ध्येयपूर्ती अशा तीन प्रमुख विभागात या विषयाची मांडणी केली आहे.

*(पृष्ठ संख्या: ११२, किंमत: रु. १२०/-)*

## हरित साधक




सध्याच्या 'विकासा'मुळे आंतरिक व बाह्य अशा दोन्ही बाजूने पर्यावरणाची हानी होत आहे, हे आता आपण जाणतोच. हा विकास असाच चालू राहिला, तर माणसे आतून मोडून पडतील आणि बाहेरून पर्यावरण. असा विनाश टाळायचा असेल, तर आजची विकासनीती व सर्वांची जीवनशैली बदलाला पर्याय नाही. हे सर्व कोसळलेच आणि तरी माणूस टिकून राहिला तर? तर यासाठी कुठल्याही 'साय - फाय' चित्रपटाची गरज नाही. त्यानंतरची जीवनशैली बरीचशी शेती आधारित, स्वावलंबी, स्थानिक उत्पादनावर आधारित, स्थानिक ऊर्जाकेंद्री, स्थानिक उपभोग असलेली, श्रमाधारित अशी असेल. सध्याच्या प्रचलित विकासाला ज्यांनी जाणीवपूर्वक नाकारले व पुढच्या 'सावध हाका' ज्यांनी जाणल्या अशापैकी काही व्यक्तींचा - कुटुंबांचा परिचय करून देणारे हे पुस्तक.


व्यक्तिगत आरोग्य आणि पर्यावरण ह्यांच्या असंख्य समस्यांचा सामना करावा लागत असूनही बहुसंख्य जण विकासाच्या मुख्य प्रवाहाबरोबरच वाहत असले तरी; हा प्रवाह हिमतीने नाकारून त्यातून बाहेर पडून वेगळ्या वाटा चोखाळणाऱ्या, जीवनाचा वेग, कार्यक्षेत्र आणि गुंतागुंत कमी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेल्या तेरा व्यक्ती / परिवारांची ओळख यामध्ये आहे. यामध्ये उच्च पदाची नोकरी सोडून शेती करणारे जसे आहेत तसेच मुंबई - बंगरुळु अशी महानगरे सोडून खेड्यात राहायला गेलेले काही जण आहेत. कोणी अभियंते आहेत तर कोणी प्राध्यापक, शिक्षणानंतर थेट शेतीत रमलेल्या युवती आहेत तसेच आयुर्वेदीय जीवनशैली स्वीकारलेल्या परदेशी महिलादेखील. 'असं जगणं शक्य आहे'. याची खात्री हे लेख वाचल्यावर आपल्याला पटते. पुस्तकात परिचय करून दिलेले हे सर्व साधक निवडताना लावलेले निकष अतिशय महत्त्वाचे होते. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा; संधी असूनही मुख्य प्रवाहातली नोकरी / व्यवसाय नाकारणे, किंवा असेल तर तो सोडून कमी अर्थार्जनाचा पर्याय स्वीकारलेला असणे याला सर्वाधिक महत्त्व होते. एखादी व्यक्ती खात्रीची नोकरी सोडून शेतीसारख्या बेभरवशाच्या उद्योगाकडे वळते त्यातूनच विचारांप्रती असलेली बांधिलकी सिद्ध होते.

*(पृष्ठ संख्या: ११४, किंमत: रु. १३०/-)*

## बदलू या जीवनशैली (भाग १ व २)

पुस्तकासारख्या स्थायी स्वरूपाच्या वाङ्मयाबरोबरच काही प्रासंगिक व तात्कालिक लेखनाची गरज आहे, असे लक्षात आल्यावर दिलीप कुलकर्णी यांनी 'गतिमान संतुलन' नावाचे मासिक सन २००१ पासून सुरू केले. 'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही








विकासनीती’ याचा पुरस्कार करणारे आणि त्या दृष्टीने विचार आणि कृती-कार्यक्रम पुढे ठेवणारे हे मासिक गेली सलग २१ वर्ष सातत्याने याविषयीचे समाज प्रबोधन करत होते. याच मासिकातील निवडक अशा ५० संपादकीय लेखांचे संकलन म्हणजे ‘बदलू या जीवनशैली’चे हे दोन भाग. हे संपादकीय लेख जरी तात्कालिक मुद्द्यांना अनुलक्षून लिहिले गेले असले तरी त्याच्या गाभ्याला स्थायी महत्त्व असल्याने ते केवळ प्रासंगिक नाहीत. आपल्या नित्य जगण्यातले विषय जसे की, सण - उत्सव - समारंभ, कौटुंबिक - सामाजिक संबंध, मनःस्वास्थ्य, धार्मिक बाबी, या व अशा बाबतीत का व कोणते परिवर्तन आवश्यक आहे यांचा ऊहापोह या लेखांमधून केला आहे. व्यापक दृष्टीने पाहता खरे तर देशपातळीवर विकास - संकल्पना आणि त्यादृष्टीने विकासनीतीमध्ये बदल अपेक्षित असला, तरी तसे बदल कोणाही सर्वसामान्य व्यक्तीच्या हातात नसल्याने प्रत्येकाने किमान स्वतःच्या जीवनशैलीत परिवर्तनाला प्रारंभ करावा असा लेखकाचा सांगावा आहे.

*(भाग १ - पृष्ठ संख्या: १०४, किंमत: रु. १००/-, भाग २ - पृष्ठ संख्या: १०४, किंमत: रु. १००/-)*

## ऊर्जा संयम

सध्याची एकूणच प्रचलित असलेली जागतिक विकासनीती आणि त्याबरोबरच वैयक्तिक जीवनशैली ऊर्जेवर आधारित आहे. ऊर्जेचा वाढता वापर हे प्रगतीच्या प्रतिमानाचे ठळक लक्षण म्हणता येईल. ऊर्जेचा असा सातत्याने वाढणारा अतिरेकी वापर हा अनेक समस्या वाढवणारा ठरला आहे. या समस्या बाह्य पर्यावरणाबरोबरच आंतरिक पर्यावरणाच्याही आहेत. ऊर्जेमुळे जीवनाची गती वाढली, भौगोलिक क्षेत्र विस्तारली, गुंतागुंत वाढली, मानसिक ताण -तणाव वाढले आणि त्याबरोबरच संसाधनांचा ऱ्हास वाढला आणि प्रदूषण वाढले. जोवर हाताशी





उपलब्ध असणाऱ्या ऊर्जा आणि तंत्रज्ञान ह्यांचे प्रमाण कमी होते तोवर बदलाचे प्रमाणही कमी होते आणि त्या प्रमाणात निसर्गात बदल घडवून आणण्याची क्षमताही नगण्य होती. आजच्या उत्पादन आणि उपभोग वाढीला सर्वस्वी जबाबदार असलेल्या ऊर्जेच्या नव-नव्या स्रोतांचा झालेला विकास हा प्रामुख्याने खनिज तेलांपासून मिळणाऱ्या ऊर्जेच्या स्वरूपात झाला. तेव्हापासून, आतून माणूस आणि बाहेरून पर्यावरण मोडून पडते आहे. पुस्तकात सुचवल्याप्रमाणे यावर एकच उपाय आहे, तो म्हणजे ऊर्जेचा अतिरेक टाळणे! त्यासाठी ‘भांडवली’ (capital) ऊर्जेचा वापर टाळून ‘आय’ (income) ऊर्जेच्या आधारे संयमित जगायला लागणे. थोडक्यात ऊर्जेचा अभाव आणि अतिरेक टाळून संतुलित जीवन जगणे. प्रस्तुत पुस्तकामधून ऊर्जेच्या वर्तमानाची ‘ऐतिहासिक’ पार्श्वभूमी, ऊर्जेचे विज्ञान, वर्तमानातील ऊर्जेच्या समस्या आणि भविष्यकाळातील ऊर्जेचे प्रतिमान अशा चार विभागातून विषयांची मांडणी केली आहे.

*(पृष्ठ संख्या: १२८, किंमत: रु. १४०/-)*

## भूतान आणि क्यूबा - सम्यक विकासाच्या दिशेने

प्राप्त परिस्थितीत वैयक्तिक स्तरावरील जीवनशैलीमध्ये बदल घडवणे महत्त्वाचे असले तरी व्यापक स्तरावर बदल घडवायचा असेल तर देशाच्या पातळीवर विकासनीतीमध्ये बदल घडवण्याला पर्याय नाही. याचे आपल्याच देशातील एक छोटेसे उदाहरण म्हणजे मध्यंतरी दिल्लीमध्ये सम आणि विषम तारखांना त्यानुसार क्रमांक असलेल्या वाहनांना रस्त्यावर




येण्याची दिलेली परवानगी. केवळ एका सरकारी आदेशामुळे प्रत्येक दिवशी रस्त्यावर असलेल्या वाहनांची संख्या निम्मी झाली. यानुसार जर आपण बघितले तर एखाद्या राष्ट्राच्या विकासाचे धोरण बदलले तर त्याचा प्रभाव मोठा असू शकतो.

विकासाच्या अशा प्रतिमानाला नाकारण्याचे धाडस ज्या काही मोजक्या देशांनी दाखवले त्यामध्ये अग्रेसर होते ‘भूतान’ आणि ‘क्युबा’. एक आपला सख्खा शेजारी, ज्याने स्वेच्छेने हे विकासाचे प्रतिमान नाकारण्याची हिंमत दाखवली. भूतान ने ‘जीडीपी’पेक्षा ‘जीएनएच’ (ग्रॉस नॅशनल हॅपीनेस) अर्थात, ‘सकल राष्ट्रीय समाधान’ याला महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी काही निकष निर्धारित केले व त्यानुसार ते धोरण यशस्वी करून दाखवले, तर दुसरा खुद्ध उत्तर अमेरिका खंडातील, ‘क्युबा’; ज्याला अनिच्छेने का असेना, प्रचलित वहिवाट सोडावी लागली. क्यूबाला मोठा आधार होता तो सोव्हिएत रशियाचा; पण पुढे त्याचे विघटन झाल्यावर तो आधारच संपला. अमेरिकेने याचा फायदा उठवण्यासाठी त्या देशावर बरेच निर्बंध लादले. उसाच्या व साखरेच्या बदल्यात तो देश जवळ जवळ सर्व गोष्टी रशियाकडून आयात करायचा. एक फटक्यात हे बंद झाल्यावर यंत्रसामग्री नाही, तेल नाही म्हटल्यावर त्या देशाने ऊस शेती बंद केली, शहराचे विकेंद्रीकरण केले, स्थानिक उत्पादन व स्थानिक उपभोगांना चालना दिली. अशा रीतीने संपूर्णतः सेंद्रिय विकासनीतीचा अवलंब करून देशाला अमेरिकेच्या जोखडातून वाचवले. आपल्या लढवय्या नेत्याच्या विजिगीषू वृत्तीला तिथल्या देशवासीयांचीही खंबीर साथ लाभली. विपरीत परिस्थितीत माणसाचा कस कसा लागतो याची साद्यंत माहिती मिळते, ‘भूतान आणि क्युबा - सम्यक विकासाच्या दिशेने’ या पुस्तकातून.

*(पृष्ठ संख्या: १२८, किंमत: रु. १५०/-)*

## स्वप्नामधील गावां...




‘स्वप्नामधील गावां...’ हे एका चिंतनशील व कृतिशील पर्यावरणवादी कुटुंबाने स्वतःच्या जीवनप्रवासाविषयी परखडपणे केलेले आत्मनिवेदन आहे. एक विशिष्ट ध्येय डोळ्यापुढे ठेवून ते गाठण्यासाठी केलेल्या पाव शतकाचा तटस्थपणे मांडलेला हा लेखाजोखा आहे. दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास, हे लिखाण आत्मस्तुतीसाठी वा स्वतःची पाठ थोपटून घेण्यासाठी नसून परिवर्तनाची स्वप्न पाहणाऱ्या त्यांच्यासारख्या अनेक वाटसरूंसाठी आहे. सजगपणे वेगळी वाट चालणाऱ्यांसाठी लेखकद्वयीचे अनुभव उपयोगी पडावे, अशा वाटचालीतल्या अडचणींची कल्पना यावी, त्या बाऊ करण्याइतक्या मोठ्या नसतात हे लक्षात यावे, आणि तसे जगणे शक्य आहे हा विश्वास यावा व अशा इच्छेला प्रेरणा मिळावी या हेतूने केलेले हे लिखाण आहे.


या पुस्तकातून त्यांच्या सुरुवातीच्या काळातील वैचारिक जडण-घडणीपासून अतिशय तपशीलवार वर्णन केले आहे. आजवर अनेक जण त्यांचे हे जीवनशैलीविषयक प्रयोग ‘याची देही’ समजून घेण्यासाठी त्यांच्या ‘कुडावळ्या’च्या घरी प्रत्यक्ष जाऊन आले. त्यावरून अशा वैचारिकतेने जगण्याबाबत समाजामध्ये औत्सुक्य आहे त्यामुळे या जीवनप्रवासाचे दस्तऐवजीकरण करणे त्यांना गरजेचे वाटले. त्यांचे हे जगणे जितके सजगतेने आहे, तितकेच उत्कटतेने. जितके विचारपूर्वक आहे, तितकेच भावपूर्णही. परिपूर्णतेचा ध्यास असलेले आणि मर्यादेचे भान असलेले. म्हणूनच त्यांचे जीवन चारचौघांसारखे आणि त्यामुळेच आपल्या आवाक्यातले आणि प्रेरणा देणारे !

प्रत्येकानेच आपली जीवनशैली निसर्गस्नेही बनवत

नेण्याची आता तातडीने गरज असल्याने ‘स्वप्नामधील गावां...’ हे पुस्तक फक्त ‘वाचण्यासाठी’ नसून यथाशक्य ‘आचरणात’ आणण्यासाठी आहे, याचे स्मरण शेवटी लेखक करून देतात.

*(पृष्ठ संख्या: २१२, किंमत: रु. २४०/-)*

### गांधी उद्यासाठी





महात्मा गांधी हे शब्द उच्चारताच मन इतिहासाकडे वळते. अशा ‘ऐतिहासिक गांधींकडे’ बघताना स्वाभाविकपणे मग दोन गट पडतात, एक त्यांचा समर्थक व दुसरा टीकाकार. खरे तर गांधींच्या विचाराकडे व कृतीकडे एका व्यक्तीचे विचार - आचार म्हणून न बघता एका व्यापक परीप्रेक्ष्यात प्रदीर्घ काळातल्या मानवी वर्तनाचा प्रवास या दृष्टीने पाहिल्यास अनेक पैलू उलगडतात. त्यांच्या विचारांमुळे व कृतीमुळे जे काही बरे वा वाईट परिणाम झाले ते आता बदलता येणार नाहीत. याचाच दुसरा अर्थ इतिहास कधी बदलता येत नाही; पण घडवता येईल ते भविष्य. गांधी विचारांपैकी जे विचार आपल्याला आज योग्य वाटतात, त्यांच्या आधारे आपल्याला पुढील वाट कशी शोधता येईल हे आज अधिक महत्त्वाचे. सध्या भेडसावणाऱ्या समस्या आणि भविष्यात भीषण स्वरूप धारण करण्याची शक्यता असलेल्या समस्यांवर गांधी विचारातून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न म्हणजे ‘गांधी उद्यासाठी’ हा ग्रंथ. यामध्ये समतेकडे नेणारा, शोषणमुक्तीकडे नेणारा, खऱ्या ‘स्वराज्या’कडे नेणारा, सत्य - अहिंसेकडे नेणारा, ‘धर्मा’कडे नेणारा, शासनविहीन समाजाकडे नेणारा असा कोणताही विचार म्हणजे ‘गांधी विचार’.

ग्रंथामध्ये विषयवार असे १७ विभाग केले असून ३७ लेखकांचे जवळपास ५० लेख यामध्ये समाविष्ट केलेले आहेत. पुस्तकाच्या उपशीर्षकानुसार, आजच्या समस्यांना गांधी विचारांच्या मंथनातून उद्यासाठी उत्तरे शोधण्याचा एक प्रयत्न म्हणजे ‘गांधी उद्यासाठी’.

महात्मा गांधी यांनी कदाचित त्यांच्या उभ्या आयुष्यात ‘पर्यावरण’ हा शब्द उच्चारला नसावा; पण ‘मेरा जीवनही मेरा संदेश हैं’, हा त्यांचा सांगावा इहलोकिची त्यांची यात्रा संपून आज सात दशकांचा काळ लोटला तरीही केवळ कालातीतच आहे असे नाही, तर पुढील येणाऱ्या कित्येक पिढ्यांना मार्गदर्शन करीत राहील. त्यांच्या विचारांमधून भविष्यकाळासाठी त्याची प्रत्यक्ष उपयोगिता काय याची दिशा दिलीप कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या ‘गांधी उद्यासाठी’ या ग्रंथातून मिळते.

*(पृष्ठ संख्या: ५८०, किंमत: रु. ६००/-)*

### विकसित भारत : अमेरिकी की आध्यात्मिक?




औद्योगिक क्रांतीनंतर जगातील बहुतेक देशांची प्रगतीची व्याख्या ही जीडीपीमधील वाढ अशीच राहिली आहे आणि विकासाचे तेच मोजमाप गृहीत धरले जाते. आपल्या देशातही राज्यकर्ते कोणीही असो, भारताची गेल्या पाऊणशे वर्षांची ‘विकास’ या शब्दाची व्याख्यादेखील ढोबळ मानाने हीच आहे. देशाच्या विकासाची व्याख्या इतकी संकुचित का झाली आणि मुळात ती तशी योग्य आहे का? प्रत्यक्षात विकसित भारताचे जे स्वप्न स्वातंत्र्यपूर्व काळातील आपल्या काही द्रष्ट्या नेत्यांनी बघितले त्याची रचना आज देश म्हणून आपण चालत असलेल्या वाटचालीशी सुसंगत आहे का? याच विचारांचा ऊहापोह करणारे ‘विकसित भारत : अमेरिकी की आध्यात्मिक?’ हे दिलीप कुलकर्णी यांचे ताजे पुस्तक. आज जगात बहुतेक देशांचे ‘विकासाचे आदर्श मॉडेल’ अमेरिका देश हेच असल्याने उपशीर्षकात ‘अमेरिकी’ या शब्दाचा वापर केला गेला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या आधारे

उत्पादन आणि उपभोग यामध्ये सातत्याने वाढीच्या 'अमेरिकी' मार्गाचे पुरस्कर्ते असलेले सावरकर, नेहरू आणि कलाम या तीन नेत्यांचा एक गट, तर उत्पादन आणि उपभोग याचे मान इष्टतम ठेवून आंतरिक विकासावर भर देणारे 'आध्यात्मिक' मार्गाचे पुरस्कर्ते असलेल्या विवेकानंद, गांधी, विनोबा आणि अरविंद यांचा दुसरा गट अशा दोन्ही बाजूंची तौलनिक मांडणी या ग्रंथात केली गेली आहे. पुस्तकात ढोबळ मानाने मांडणीसाठी पहिल्या गटाच्या विचारांचे खंडन आणि दुसऱ्या गटाचे मंडन असे केले असले तरी पुस्तकात एकूण मांडणी इतकी 'काळी' व 'पांढरी' केलेली नाही हे लेखक प्रस्तावनेत स्पष्ट करतात. पहिल्या तिन्ही नेत्यांचे जे विचार, मतं योग्य वाटली त्याचा स्वीकारही केला असून उर्वरित चारही नेत्यांच्या विचारात जिथे अंतर्विरोध वाटला तोही दाखवून दिला आहे. थोडक्यात पुस्तकात 'खंडन' वा 'मंडन' त्या-त्या व्यक्तीचे नसून त्यांच्या विचारांचे आहे.

पुस्तकात दोन्ही गटाची दोन स्वतंत्र विभागात मांडणी केली आहे, तर पहिल्या विभागात विकास संकल्पनांची ओळख करून दिली आहे. 'भारताच्या भावी विकासाची दिशा' या चौथ्या आणि शेवटच्या विभागात वैचारिक समन्वय, भावी विकासनीती तसेच जीवनशैली याविषयी चर्चा केली आहे. प्रत्येक नेत्याचे या संबंधातले जे विचार पुस्तकात उदधृत केले आहेत त्याची सविस्तर संदर्भसूची पुस्तकाच्या शेवटी दिली गेली आहे.

*(पृष्ठ संख्या: २५६, किंमत: रु. ३००/-)*

दुर्दैवाने विकासाचे 'अमेरिकी' प्रतिमानच जगात सर्वत्र स्वीकारले गेले ही वस्तुस्थिती आहे. हे सर्वमान्य झालेले प्रतिमान खरोखरच योग्य आहे का; याचा सारासार विचार सर्वसामान्यांनी करूच नये याची पूर्ण खबरदारी जगभरातील भांडवलदार आणि बहुराष्ट्रीय उद्योग नेहमीच घेत आले आहेत. आपले हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी कधीकधी राजसत्तांना हाताशी धरून धोरणंही तयार केली जातात. ऊर्जा तसेच यंत्रशक्तीच्या बळावर केवळ अर्थकारणालाच महत्त्व प्राप्त झाल्याने सीमित असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा ह्रास



होणे अपरिहार्य आहे. औद्योगिक क्रांतीनंतर मानव जातीचा प्रवास दोन विरुध्द दिशांनी सुरू झाला. एकीकडे दैनंदिन जीवनात भौतिक वस्तूंमध्ये बेसुमार वाढ झाल्याने उपभोग वाढत जाऊन प्रगतीचा आभास निर्माण झाला, तर दुसरीकडे या वस्तू निर्माण करण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती अनिर्बंधपणे वापरल्यामुळे निसर्गसंपदा आक्रसत जाऊन पर्यावरणीय संकटं वाढत गेली. वास्तविक भारतीय जीवनपध्दती व संस्कृती ही प्राचीन काळापासून निसर्गशक्तीचा आदर राखणारी आणि त्याचे महत्त्व जाणणारी आहे. याचा प्रत्यय ऋतुचक्रानुसार पाळले जाणारे सण, उत्सव व चालीरिती यांधून प्रत्ययास येते; पण दुर्दैवाने हजारो वर्षांपासून पाळल्या जाणाऱ्या या जीवनशैलीवर केवळ काही शे वर्ष जुन्या असलेल्या पाश्चिमात्य विचारसरणीचा पगडा बसल्यामुळे ह्रासाची ही परिस्थिती आज आपण अनुभवतो आहोत. यातून आपल्या सर्वांना प्रयत्नपूर्वक बाहेर पडण्याचा मार्ग दाखवणारी व्यापक जीवनदृष्टी दिलीप कुलकर्णी यांच्या वरील ग्रंथसंपदेतून वाचकाला उलगडत जाते. केवळ मराठीतूनच नाही तर अन्य कुठल्याही भाषेतून पर्यावरणीय विषयावर इतकी व्यापक आणि परिपूर्ण मांडणी क्वचितच झाली असावी.

■

ajitbarje@gmail.com